# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 30/11/2017 रोजी (का.प.क्र.14) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक 30 नोव्हेंबर 2017 रोजी (का.प.क्र.14) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 4-00 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
09. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
10. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
11. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
12. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.राजगौरव वानखेडे :आजच्या वर्तमान पत्रामध्ये लाड समितीच्या भरती संदर्भात शासनाकडून रिपोर्ट सादर केलेला आहे.लाड समितीच्या प्रकरणात काही अधिकारी कर्मचारी दोषी असल्याचे दिसून येते, या प्रकरणाची ज्यांनी चौकशी केली आहे. ते मा.श्री.तुकाराम मुंढे यांनी जो अहवाल शासनाकडे दिलेला होता त्यानुसार शासनाने जे पत्र महापालिकेला पाठविले आहे. ते पत्र केंव्हा आले त्या प्रकरणात कोणते अधिकारी कर्मचारी दोषी आहे? त्याची सर्व माहिती प्रशासनाने सभागृहाला दयावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :शासनाकडून महापालिकेकडे रिपोर्ट आला आहे. या प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून श्री.तुकाराम मुंढे यांनी नियुक्ती केलेली होती त्यांनी सन 2010 ते 2014 च्या कालावधीत लाड समितीचे अधिकारानुसार जे कर्मचारी नोकरीवर लागले त्या बाबतीत चौकशी अहवालामध्ये विविध प्रकाराचे आक्षेप घेतलेले आहेत. जवळपास 488 कर्मचाऱ्यांच्या निवृती बाबत आक्षेप आहे. त्यामध्ये तत्कालीन उपआयुक्त प्रशासन, लेखा अधिकारी, उपआयुक्त महसुल व इतर अधिकारी कर्मचारी संशयास्पद आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :या लाड समितीच्या भरती प्रकरणामध्ये जे अधिकारी कर्मचारी दोषी असतील त्यांची नावे जाहीर करावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :या सबंधिचा अहवाल मा.आयुक्तांकडे सादर केला आहे. त्यांच्याकडुन अहवाल आला की, सभागृहा समोर माहिती देण्यात येईल. तो अहवाल काल माझ्याकडे आला. त्यामध्ये अधिकारी आणि कर्मचारी मिळून एकूण 11 नावे आहेत.

मा.सभापती :प्रशासनाकडे अहवाल आलेला आहे. तो गोपनीय असल्यामुळे त्यांना ते उघडकीस करता येणार नाही. याबाबत पुर्ण माहिती पुढच्या बैठकी मध्ये घेतली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :कार्यवाही करण्या बाबत किती कालावधी दिलेला आहे? पेपरला वाचण्यात आले की, हिवाळी अधिवेशन सुरु होण्यापुर्वी या दोषीवर काय करणार आहे.असे त्या अहवालात दिलेले आहे का ?

अतिरिक्त आयुक्त :संबधीतावर दोषारोप पत्र तयार करुन पुढील कार्यवाही करावयाची आहे. माहितीचा अहवाल शासनाला दयायचा आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्तांशी मा.सभापती यांनी चर्चा करावी जे दोषी आहेत त्यांची नावे पुढील बैठकीत सादर करावी.

मा.सभापती :शासनाने या प्रकरणामध्ये जे निर्देश दिले त्यानुसार प्रशासनाने काम करावे.जी जी कार्यवाही करणार आहे त्याची माहिती सभागृहासमोर सादर करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :नगर रचना विभागातील श्री.जयंत खरवडकर याची बदली करण्यात आली त्यांनी तीन दिवसात संबधीत विभागात रूजू व्हावे असे म्हटले होते परंतु ते रूजू झाले नाही.याचे कारण काय माहिती दयावी.

मा.सभापती :श्री.जयंत खरवडकर यांची बदली झाली ते रूजू का झाले नाही? त्याची माहिती द्यावी.

उपआयुक्त (म) :यावर मागिल बैठकीत चर्चा झाली होती मा.सभापतींनी निर्देश दिले होते की त्यांनी तीन दिवसात रुजु व्हावे ते रुजु झाले नाहीत.ते का रूजू झाले नाही? पत्र देण्याबाबत आस्थापना अधिकाऱ्यांना सुचना केली आहे.ती संचिका प्रत्यक्ष बघीतली त्यांची बदली केल्या प्रकरणी प्रशासनाला पत्र दिले की. मी तांत्रिक संवर्गातील अधिकारी असल्यामुळे माझी बदली अतांत्रिक पदावर करु शकत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :तांत्रिक संवर्गातील किती अधिकारी आहेत? किती पदे भरण्यात आली आहे. कोणती पदे भरण्यात आली आहे.अनेक अधिकारी तांत्रिक संवर्गातील नसतांना इतर पदावर काम करीत आहे श्री.काझी श्री.पाठक कुठे काम करतात? बाकीचे जे तंात्रिक अधिकारी आहेत. त्यांना कोणता चार्ज दिला एका अधिका-यांला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा एक न्याय घ्यायच्या दुसरा प्रश्न असा की, मी पत्र देऊन माहिती मागितली होती की सहायक नगर रचनाकार हे अस्तित्वात आहे का मला उत्तर दिले की हे पद महानगरपालिकेच्या आस्थापनावर मंजूर असल्याचे दिसुन येत नाही. पद मंजूर नसतांना ते दिलेल्या ठिकाणी रूजू का होत नाही?

उपआयुक्त (म) :सन-2010 मध्ये निवडसमिती गठीत करण्यात आली होती. निवड समिती मध्ये येणाऱ्या सहाय्यक नगर रचनाकार आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :जे पद अस्थित्वात नाही ते पद अस्थित्वात का आणता? सन-2010 मध्ये त्यांना ते पद देण्यात आले होते. आता ते पद अस्थित्वात नाही. ते पद कोणालाही देणार का? म्हणजे एखादया अधिकाऱ्याला पद देणार व ते पद निर्माण करायाचे यांच्या मध्ये सेवा भरती च्या संदर्भामध्ये पद भरत असताना त्या पदाला सेवा भरती नियमावली आहे. आस्थापनेवर हे पद भरत असतांना योग्य ती कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सहाय्यक संचालक नगररचना हे पद अस्तित्वात आहे का स.सदस्य जी माहिती विचारतात ती त्यांना चुकीची दिली जाते या पदाच्या संदर्भात नेमके नियम काय आहे? खुलासा होणे अतिशय गरजेचे आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :विधी विभागाला माहिती विचारावी मा.कोर्टाने असे म्हटले की का चर्चेला कोणतेही प्रकरण घेऊ नये जे चुकीचे वाटते त्याबाबत आम्ही काही विचारु नये का?
(स.सदस्य आपआपसात बोलत होते)

विद्यी सल्लागार :श्री.जयंत खरवडकर यांनी 2003 मध्ये जे पीटीशन दाखल केले होते. 2002 मध्ये आयुक्तानी रिव्हर्ट केले होते. ते त्यानी चॅलेंज केले होते. आणि दिनांक 28/08/2002 जे सुप्रीम कोर्टामध्ये प्रकरण होते व 2003 मध्ये जे पीटीशन होते की पहिले ते रिजेक्ट झाले. नंतर ते सुप्रीम कोर्टात गेले व नंतर पहिले ते हाय कोर्टात ते रिव्हयु झाले, त्याच्या विरुध्द को-ऑपरेशन पुन्हा ऐखादया रिव्हयु Application दाखल केले म्हणजे मा.हायकोर्टाने दाखल केले होते. मी त्यासाठी ए.पी.सी.दाखल केले असुन उद्या त्याची तारीख आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सुप्रीम कोर्टाने सांगितले की,एप्रिल मध्ये तत्कालीन आयुक्तांनी त्यांची अतिक्रमन विभागामध्ये बदली केली होती,ते रुजु न होता. एखादया अधिकाऱ्याला तेथे रुजु का होत नाहीत. त्यांची कुठेही बदली करणार का किंवा करू नये असे मा.कोर्टाने म्हटले का? याचा खुलासा करावा.

विद्यी सल्लागार :मा.सभापती जे सुप्रीम कोर्टामध्ये प्रकरण आहे, मुळात ते मा.उच्च न्यायालयात आहे ते आपल्या विरुध्द आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :सुप्रीम कोर्टाने आपल्या त्या आदेशाला स्थगिती दिली होती. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाने तत्कालीन आयुक्त श्री.महाजन साहेबांनी त्या व्यक्तीची बदली केली होती, तेव्हा ती व्यक्ती तेथे का रुजु झाले नाहीत? बाकीचेही काही अधिकारी तांत्रिक आहेत. ते इतर ठिकाणी काम करतात.

विद्यी सल्लागार :या प्रकरणाच्या अनुषंगाने 1995 मध्ये एक मॅटर दाखल केले होते, यात असे म्हटले होते की, यापूर्वी दिनांक 13/06/1995 ला नगररचना मधून वॉटर सप्लाय मध्ये बदली झाली होती. त्यांनी ती चॅलेंज केली होती.

श्री.राजगौरव वानखेडे :असा सुप्रीम कोर्टाने आदेश दिला होता का? तेथे रुजु व्हावे असे का झाले नाही? ज्या वेळेस निर्णय लागेल, त्या वेळेस पदाच्या नियुक्तीवरुन सांगतो की, हे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले नाहीत. बदली करतांना या आयुक्तांनी जेव्हा निर्णय दिल्याच्या नंतर त्या अधिकाऱ्यांचे काम होते. मा.सभापती तुम्ही पत्र दिले होते की, श्री.आलुरकर साहेबांना त्यांना कामाच्या संदर्भात बोलायचे आहे. त्यांनी येथे हजर व्हावे. मा.सभापती साहेब आपण त्या दिवशी एक पत्र दिले होते की, त्या मिटिंगला फाईल सोबत हजर व्हावे ते हजर राहिले नाहीत. त्यांना काम करायचे नाही का? याच्यामध्ये त्यांना माहिती होते की, स्थायी सभेमध्ये तो विषय घेणार नाही का? त्यांना येथे काम करायचे नाही का? जे कोणी अधिकारी असेल त्यांना येथे बोलवावे. मला ऐवढीच माहिती पाहिजे कि, भुखंड क्र.315 एन- 3 सिडको या भु-खंडावर बांधकाम परवानगी देतांना संचिका कोणी हाताळली.

उपअभियंता (श्री.एस.एस.कुलकर्णी) : भुखंड क्र.315 एन-3 सिडको येथील परवानगी देताना श्री.जयंत खरवडकर सहाय्यक रचनाकार व श्री.आलुरकर सहाय्यक संचालक नगर रचना ऑक्टोबर 2017 परवानगी देण्यात आली. या मध्ये रिव्हर्ट करुन देणाऱ्यांची नावे तीन आहेत. श्री.देशमुख साहेब,मी स्वत:,श्री.जयंत खरवडकर.

श्री.राजगौरव वानखेडे :हि परवानगी कोणत्या विभागामध्ये देण्यात आली?

उपअभियंता (श्री.एस.एस.कुलकर्णी):झोन नं.6 एन-3 सिडको येथे परवानगी आहे. तो चार्ज माझ्याकडे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : यामध्ये दिनांक 12-7-2017 ला श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी जी परवानगी दिली आहे. एन 3 सिडको भागामध्ये वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आलेली ती चुकीची आहे. त्यामध्ये गैरव्यवहार केला का? यामध्ये त्यांच्याकडे चार्ज नसतांना ती

परवानगी देण्यात आली. त्यामध्ये बांधकामाच्या संदर्भामध्ये चुकीची परवानगी दिली जाते. यांना माहिती आहे. हे लवकर मॅनेज होणार नाही. ते कोणालाही मॅनेज करु शकतात का? कोणताही अधिकारीला फाईल दयाची हे काम कोणत्या नियमानुसार केले आहेत?

मा.सभापती : याच्या बदल आपल्याला काही माहिती आहे काय?

सहाय्यक संचालक (न.र.) : मला याच्या बद्दल काहीही महिती नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :याच्यामध्ये लेखी ऑर्डर दिली होती की, दि.12/7/2017 मध्ये श्री.एस.एस. कुलकर्णी यांनी दिली होती तर या मध्ये श्री.आलुरकर यांनी त्यांची ऑर्डर काढली होती. त्यांची ऑर्डर नसतानाही दुसऱ्या विभागामध्ये ती फाईल काढली ती चुकीची काढली. माझे असे मत आहे कि, यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. सर्वात महत्त्वाचे की, 2008 ला तत्कालीन आयुक्त श्री.जयंत खरवडकर यांची चौकशी लावली होती का?

उपआयुक्त (म) :यामध्ये मला काहीही कल्पना नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :पैठणगेट जवळ शनिव्दारला इमारती च्या बांधकामाच्या परवानगीच्या संदर्भामध्ये त्या वेळेस तत्कालीन आयुक्त यानी चौकशी लावली होती.त्याचौकशीमध्ये शहर अभियंता श्री.म्हस्के यानी ती चौकशी करायची सांगितली होती. ती चौकशी मागील 9 वर्षा पासुन पेंडीग पडली होती. प्रकरणाची चौकशी झाली नाही. त्या प्रकरणाची चौकशी चालु असतांना त्या अधिकाऱ्यांना पदावर ठेऊ शकतो का? यामध्ये 2008 नुसार त्यांची चौकशी लावावी आणि परत त्याला तेथे ठेवायाचे की नाही याचा निर्णय घ्यावा.

मा.सभापती :स.सदस्य यांनी जी माहिती विचारली, ती पुढच्या बैठकीपर्यंत सादर करावी?

श्री.राजगौरव वानखेडे :ती चौकशी थांबलेली आहे,श्री.म्हस्के साहेब आता त्या पदावर नाही. आता त्यावर दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणुक करावी आणि त्याची चौकशी अंतिम करुन ती स्थायी समिती सभेसमोर ठेवावी, पुढच्या वेळेस श्री.आलुरकर ते आज मिटींगला हजर नाही. आपण एखादा निर्णय दिला तर प्रशासन त्यावर कार्यवाही करित नाही.

मा.सभापती :यामध्ये आपण जी माहिती सागितली त्या दिवशी आदेशीत केले आपण तेथे जाऊन काम करा तीन दिवस त्याचा पाठपुरावा केला. माहिती दिली कि, सुप्रीम कोर्ट मध्ये केस चालु आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :या मध्ये सुप्रीम कोर्ट ने कोणताच आदेश दिला नाही. त्या नुसार अधिकाऱ्यांची बदली करु नका आस्थापनाला त्यांनी असे पत्र दिले. मी तांत्रिक आहे यामध्ये बाकीचे नाही का? श्री.काझी साहेब व श्री.पाठक आहे. त्यांच्या का बदल्या केल्या? आपण या संदर्भामध्ये आयुक्तांचे अधिकार आहे. यामध्ये बदली करत असताना तत्कालीन आयुक्त यांना ते समजले नाही का?

मा.सभापती :स.सदस्य त्यांनी जी माहिती सांगितली ती पुढच्या बैठकी पर्यंत चौकशी करुन घ्या.

श्री.राजगौरव वानखेडे : त्यांची बदली करण्यांत यावी, नसताना हि जी चौकशी झालेली आहे, 2008 मध्ये कोणतीही करवाई झाली नाही. मी याच्या बद्दल कोणतीही चर्चा करणार नाही.

श्री.अजिम अहेमद :मा.सभापती साहेब मी एक मुद्दा संजय पवार याच्या बद्दल मांडला होता. श्री.संजय पवारचा मुद्दा होता कि, त्या मुद्यावर 7 ते 8 जणाने विचारले होते. त्या एका मॅटर मध्ये त्यांची बदली झाली ते काम करीत असताना यामध्ये श्री.संजय पवार याना वॉर्डामध्ये का काम करता येत नाही. मागच्या वेळेस त्यांना आदेश दिला होता त्यांनी तेथे काम करायला पाहिजे.

मा.सभापती :श्री.संजय पवार यांच्या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (म) :मा.सभापती साहेब या मध्ये श्री.संजय पवार यांची वॉर्ड अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. ते आता रुजु झाले का,नाही ते सांगता येणार नाही, परंतु ते सद्यस्थितीत रजेवर आहे.

(या विषयी स.सदस्य बोलत होते.)

श्रीमती.मनिषा मुंढे :मा.सभापती साहेब माझ्या वॉर्ड क्र.91 मध्ये नाल्या वर अतिक्रमण काढलेले आहे. 8 दिवस बांधकाम बंद पडले आहे.नकाशामध्ये जसे आहे. तसे काम करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला कि, वॉर्ड क्र.91 मध्ये काम बंद पडलेले आहे. त्याचे काय कारण आहे?

श्री.एम.बी. काझी : जय भवानीनगर या ठिकाणी अस्तिवातील नाल्यावर अनाधिकृत बांधकामे होती ती निष्कासित करण्याचे काम आपण हाती घेतलेले आहे? आता ते सध्या चालु आहे. आणि नाल्याची जी माती आहे. तेथे ड्रेनेज असलेली जी जागा आहे. साडे सहा मिटरची आणि आपल्या भुमीगत विभागाची असलेली जागा व त्या नुसार आम्ही ते बांधकाम करत आहोत. त्या ठिकाणी काही अडचण निर्माण झाली आहे. त्या मार्कींग नुसार आम्हाला जागा निश्चित करुन दया.

श्री.अफसर सिद्यीकी : ज्या मातीचे सपाटीकरण केले आहे, नाल्याला जी जागा आहे. ती म्हणजे दोन्ही बाजुने साडे सहा मिटरची जागा मिळेल तेव्हा तेथे काम होऊ शकेल व त्याच्या वर काम होऊ शकते.

श्री.रेणुकादास वैद्य :या मध्ये विषय असा आहे कि,श्री.काझी साहेब व श्री.सिध्दीकी साहेब हे त्याच्या कडे गेले होते. याचे कारण आहे, तुमच्या खालचे लोक आहेत त्यांनी माती ईकडे तिकडे केली एक नाल्याच्या एकासाईटला साडेसात मिटर जागा व दुसरा साईटला अडीच मिटर जागा आहे. हि कोणती पध्दत आहे.तुम्ही दोन्ही साईटने पाच मिटरची जागा दया. तुम्ही खालच्या लोकावर विश्वास ठेऊन काम करित आहात का.

मा.सभापती :श्री.रेणुकादास वैद्य यांनी जी माहिती सांगितली कि, तेथे तुम्ही दोघेही स्वतः जाऊन काम करुन घ्या.

श्रीमती स्वाती नागरे :मा.सभापती साहेब माझ्या वार्ड मध्ये दोन ऑफीस आहेत. झोन क्र.4 त्याच्या समोर आहे, वाळुचे व खडीचे ट्रॅक्टर उभे राहतात ते आता पर्यंत काढलेली नाही.

मा.सभापती : मी यापूर्वीही सांगितलेले आहे, त्याठिकाणी सेक्युरिटी देण्यांत यावे व अतिक्रमणे काढण्यांत यावीत.

कक्ष प्रमुख(अतिक्रमण) :मा.सभापती साहेब जे आपण रेग्युलर सेक्युरिटी दिले होते.दोन टी.व्ही.सेंटर च्या रस्त्यावर आणि दोन उद्यान च्या रस्त्यावर त्यापैकी 10 ते 11 सेक्युरिटी महाराणा एजंन्सी देत आहेत. आणि मजबुत सेक्युरिटी घेण्याचा आमचा प्रयत्न आहेत.त्यांनी काही भागामध्ये सेक्युरिटी दिली होती.

मा.सभापती :आपण कोणत्याही परिस्थीती मध्ये त्या भागात सेक्युरिटी ठेवावी आणि तेथे वाळुचे व खडीचे टॅक्टर उभे राहता कामे नये?

श्री.सिताराम सुरे :मा.सभापती साहेब माझा जो विषय आहे. तो प्रस्ताव संबंधित आहेत. त्या अधिकाऱ्याला येथे बोलवावे.

मा.सभापती साहेब जे प्रकल्प विभागामार्फत सन-2016 ते 2018 मध्ये मुद्या दिला होता. माझी एक विनंती कि, गेल्या दोन ते तीन वर्षापासुन जे फार्म भरले आहेत. तर मला प्रकल्प विभाग काय काम करत आहे. मला त्याची माहिती पाहिजे?

मा.सभापती :याच्या बद्दल माहिती आहे का?

| | |
|---|---|
| उपआयुक्त(म) | :याच्या बद्दल मला काहीही माहिती नाही. माहिती घेऊन देतो. |
| अतिरिक्त आयुक्त | :आपले याप्रमाणे 300 चे टारगेट होते. 37 कर्मचारी तेथे रुजु झाले.आपल्या कडे बँक 100 आहेत. सर्व मॅनेजरची बैठक घेतली होती. त्या मध्ये 100 पैकी 22 नियुक्त आहेत. आणि त्यांना टारगेट दिले होते. कि, हे काम तुम्ही डिसेंबर पर्यंत करुन दया. आणि शासन स्तरावर सुध्दा तक्रार आली होती. |
| श्री.रुपचंद वाघमारे | :मा.अतिरिक्त आयुक्त साहेब किती बँकाना डिपॉझिट आहेत. याची माहिती आहे का? 4 वर्षापासुन आम्ही फॉर्म भरतो ते दर वर्षी आम्ही फॉर्म भरतो ते बँकेत जात नाहीत व बँकेत त्यांचे प्रस्ताव मंजुर होत नाहीत. |
| अतिरिक्त आयुक्त | :त्याची तक्रार आम्ही रिझर्व्ह बँकेत सुध्दा पाठविली व मा.महापौर यांच्या आदेशानुसार दखल घेऊ. |
| श्री.सिताराम सुरे | :मा.सभापती साहेब आता पर्यंत जवळपास 7 ते 8 संदस्याना फार्म भरले मी फक्त 4 पत्र दिलेत्या पैकी एक ही काम झाले नाहीत.कोणताही अधिकारी उत्तर देत नाहीत. अधिकारी कोणतेच काम करत नाही. |
| मा.सभापती | :याची माहिती आली नाही. परंतु पुढच्या बैठकीत याची माहिती घेऊ. |
| श्रीमती.संगिता वाघुले | :याच्या मध्ये प्रत्येकाच्या वॉर्डमध्ये ज्या ज्या ठिकाणी फॉर्म भरण्यात येतील त्या ठिकाणी मॅनेजर साहेब तेथे राहतच नाहीत. तेथे नेहमी खुर्ची खाली असते |
| श्री.रुपचंद वाघमारे | :मा.सभापती साहेब पुढच्या बँकेची माहिती सांगतो कि, जे टेंडरचे लोक असतात ते मंजुर करत नाहीत. (या वेळेस स.सदस्य आपसात बोलत होते.) |
| मा.सभापती | :याच्या बदल सर्व माहिती घेऊन पुढच्या बैठकी पर्यंत निर्णय देऊ. |
| श्री.सिताराम सुरे | :मागच्या 14 तारखेच्या मिटींगमध्ये उच्च न्यायलयात सर्व्हे नंबर 27/1 चे निर्णय बाबत तेथे काम बंद आहेत,ते चालु झाले पाहिजे. त्या संदर्भात काय झाले त्याचा खुलासा करावा. |
| मा.सभापती | :विधी सल्लागार मागच्या बैठकीमध्ये स.सदस्यांनी मुद्या उपस्थित केला होता. |
| विधी सल्लागार | :सुरे साहेबाची व माझी मागच्या आठवडयात या बाबत चर्चा झाली. स.सदस्यांना आणि आम्हाला विधी विभागाला एक नोटीस आली होती. पिटिशन ची कॉपी आली नव्हती. आम्ही ती वकीलाकडुन प्राप्त करुन घेतली होती. ती माहिती टाऊन प्लॅनीग विभागात परत पाठविली व त्याची माहिती माझ्याकडे आतापर्यंत आली नाही. |
| मा.सभापती | :या विषयाची माहिती घ्या आणि पुढच्या बैठकी पर्यंत कळवा. |
| श्री.सिताराम सुरे | :मा.सभापती साहेब पुढच्या बैठकी पर्यंत तेथे जे.सी.बी लावले पाहिजे.कोर्टात हुकुम नाही. माझ्या माहिती प्रमाणे. कोर्टाने मला नोटीस दिली का? |
| मा.सभापती | :त्वरीत यावर निर्णय घ्या आणि संबधित विभागाला या बाबत आदेशीत करावे. |
| श्री.सिताराम सुरे | :तिसऱ्यांदा असे झाले आहे, चौथ्या वेळेस मी ऐकणार नाही. शासनाने आपल्याला मागच्या वेळेस 25 कोटी रुपये दिले होते. त्यामध्ये किती खर्च झाले व किती बाकी आहे ते सांगता येईल का? |
| मा.सभापती | :तुम्हाला ती माहिती उद्या पर्यंत देण्यात येईल? |
| श्री.राजगौरव वानखेडे | :24 कोटी रुपये मध्ये कोणकोणते रस्ते झाले होते?आपण जालना रोड हा रस्ता वगळला होता.त्या संदर्भामध्ये 6 कोटी रुपये मध्ये कोणता रस्ता करण्यात आला? व कुठे वगळला याची माहिती शहर अभियंता यांनी सभागृहा समोर दयावी. |
| शहर अभियंता | :स.सदस्यानी जो प्रश्न उपस्थित केला आहे. 25 ते 30 कोटी रुपये आहे. तर त्यामध्ये 5 रस्ते घेतले होते. त्या पैकी पहिला रस्ता क्रांती चौक ते बाबा पेट्रोलपंप हा रस्ता |

आपण नॅशनल हायवे करणार आहेत. अशी माहिती मिळाल्यावरुन आपले त्याच्या वरुन व सीव्ह करण्यात येईल या जो फंड आपण कैलास नगर ते लक्ष्मण चावडी रोड ते एम.जी.एम. रोड याच्यातील आपण 5 रस्ते तयार करणार आहेत. त्याच्यातील अडीच कोटी रुपये मा.घडमोडे साहेब यांच्या वॉर्डामध्ये प्राप्त करण्यात आले.

श्री.सिताराम सुरे : 6 कोटी रुपये बाकी आहे. माझ्या माहिती नुसार जर पैसे शिल्क आसेल तर आमच्या भागामध्ये काळया मातीचे जंगल आहेत.तर तीथे 120 फुटाचा रोड टाकावे आहे. तीथे 80 फुटाचा रोड आहे. आता पर्यंत खडी सुध्दा टाकली नाही.

श्रीमती किर्ती शिंदे :मागच्या मिटींगमध्ये एस.आय. चा विषय होता. तर त्यामध्ये काही खुलासा करण्यात यावा. आणि प्रशासनानी हा विषय सर्व साधारण सभे मध्ये घेण्यात यावा व वेतन वाढ देण्यात यावी, याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मागच्या मिटींगमध्ये एस.आय. चा विषय होता, स.सदंस्यानी प्रश्न उपस्थित केला आहे, त्याचा खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :एस.आय. चे कर्मचारी आहेत. ते वर्ग 4 चे कर्मचारी आहे. त्यांनी एस.आय. चा कोर्स पुर्ण केला असल्यामुळे ते काम करीत आहेत. त्यांना रेग्युलर पद द्यावयाचे असेल तर शासनाकडुन पदाला मान्यता घ्यावी लागेल किंवा आपल्या आस्थापनावर पद नसतील तर शासनाची मान्यता घेऊन ते करावे लागतील.

मा.सभापती :आपल्याकडे जी पदे रिक्त असतील, त्याची माहिती घेऊन सदस्यांना दयावी.

श्रीमती किर्ती शिंदे :हा विषय सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्तावीत करण्यात यावा असा आदेश देण्यात यावा. यामध्ये दुसरा विषय आहे कि, पाणी पुरावठयाचे जे कर्मचारी आहेत. त्यांचे जे काम आहेत. ते दोन तीन वॉर्डामध्ये करतात ते गाडीवर फिरत असतात यामुळे त्यांचा पेट्रोलला खर्च होतो. ज्याप्रमाणे विद्युत कर्मचारी यांना पेट्रोल भत्ता दिला जातो त्या प्रमाणे या कर्मचांऱ्याना सुध्दा पेट्रोल भत्ता देण्यात यावा आणि त्यांचे दोन वर्षाचे जे थकीत भत्ता आहे, तो देण्यात यावा तसेच दर महिन्याचे ओव्हर टाईमचे पैसे देण्यात यावे आणि चालु महिन्याचे या पगारात देण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी जी माहिती सांगितली कि, पेट्रोल भत्ता देण्याचे प्रस्ताव आपल्याकडे दिले असतील,तर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :याच्या मध्ये 2010 ते 2012 मध्ये आपल्या कडे पैसे होते ते तत्कालीन आयुक्त साहेबांनी आदेशीत केले होते ते आता पर्यंत देण्यांत आलेले नाही. 2012 ते 2017 आणि आतापर्यंत 5 वर्ष पुर्ण झाली ते आता रात्री बे रात्री काम करतात आपल्या शहराला पाणी मिळत आहे, त्यांना पैशासाठी थांबवे लागते हे चुकीचे आहे.

मा.सभापती :मा.आयुक्त साहेबाना आदेशीत करण्यात येते कि, हा विषय मागच्या वेळेस सुध्दा उपस्थित करण्यात आला होता.आतापर्यंत त्याची माहिती आली नाही. दखल घ्यावी.

रेणुकादास वैद्य : दिनांक 4/10/2012 मध्ये जे निर्णय झालेले आहे. त्यांना सुटटीच्या दिवशी पैशाच्या मोबदला देण्यात यावा आता पर्यंत कुठली ही कार्यवाही झालेली नाही. त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. 6 ते 8 महिने झाले त्यांचे आतापर्यंत वेतन नाही. या कर्मचाऱ्यांचा विचार करावा व त्यांचा पगार वेळेवर करावा.

मा.सभापती :स.सदस्यानी जो विषय मांडला होता कि, पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांना सुटटीच्या दिवशी त्यांना मोबदला देण्यात यावा व मागच्या दिवाळीच्या दिवशी हा विषय घेतला होता. कि,त्यांना दिवाळी झाल्यावर देऊ यांच्या माहितीची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती.किर्ती शिंदे :मा.सभापती महिलांसाठीचा हा विषय आहे. मागील 2 वर्षापासुन शौचालयाची चर्चा करतो त्याचे उद्‌घाटन केले. परंतु आज पर्यंत त्याचे काम पुर्ण झाले नाही. किती महिन्यापासुन काम बंद आहे? यांच्या खुलासा व्हावा.

मा.सभापती :आपण मागच्या बैठकीत हा विषय घेतला होता त्याचा खुलासा करण्यात आला होता. काय कार्यवाही करण्यात येणार आहे.

कार्यकारी अभियंता(ड्रेनेज): 5 ठिकाणी शौचालय बांधण्यात येणार आहेत. याच्यामध्ये 8 महिने झाले ते काम पुर्ण झाले नाही. त्या संबधीत एजन्सीला चार पत्र दिले होते. मी 10 वेळेस तेथे जाऊन आलो.

मा.सभापती :स.सदस्यांना या विषयाची माहिती दया व ते काम पुर्ण करुन घ्या.

श्रीमती.किर्ती शिंदे :मा.सभापती साहेब येत्या 8 मार्च पर्यंत शौचालयाचे काम पुर्ण नाही झाले तर मी मा.उच्च न्यायालयात मध्ये याचिका दाखल करणार आहे. आणि महिला दिन आहे.तो पर्यंत काम पुर्ण करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :त्यांनी आपल्या समोर मा.महापौराकडे पत्र दिले होते.त्याचा प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे.आता श्री.राजगौरव वानखेडे सांगत होते कि, सिडको नाटयगृह ज्या वेळेस बांधण्यात आले होते. त्यावेळेस मा.मुख्यमंत्री म्हणाले होते आता ते सभागृह पाहून घ्या आणि भविष्यात याची काय परिस्थीती असेल सांगता येत नाही. कारण त्यांना पुढे काय अवस्था राहील हे दिसुन येत आहे.

मा.सभापती साहेब उद्यानची तशी अवस्था होऊ नये आणि आपल्याकडे पाण्याची व सेक्युरिटीची सेवा या दोन गोष्टी मागितल्या होत्या ऐवढया गोष्टी होत असतानी उद्यानाची कायम स्वरुपी देखभाल राहण्यासाठी तेथे राष्ट्रध्वज उभारण्यात आले आहेत. त्यांना तात्काळ तेथे परवानगी दयावी अशी माझी विनंती आहे.

मा.सभापती :मा.महापौर श्री.नंदकुमार घोडेले यांनी पत्र असे दिले कि, सी.आय.एम ला विनंती केली होती कि, क्रांती चौक येथील प्रस्ताव दिला असताना आपण तो मंजुर करत आहोत. आणि त्या ठिकाणी तीन सेक्युरिटी देण्यात यावेत व संबंधित विभागाने याची दखल घ्यावी व त्याचप्रमाणे पाण्याची व लाईटची व्यवस्था करावी आणि हा विषय आपण मंजुर करत आहोत.

मा.सभापती :स.सदस्यांनी सांगितले होते,श्री.संजय पवार हे रजेवर होते का? याची माहिती सांगा.

उपआयुक्त (म) : दिनांक 4/9/2017 ला श्री.संजय पवार यांना वॉर्ड अधिकारी म्हणुन पदभार देण्यांत आला होता, ते दिनांक 11/9/2017 पासुन वैद्यकिय रजेवर आहेत.

मा.सभापती : सध्या ते सुटटीवर आहेत. याची माहिती दखल घेऊनच योग्य ते निर्णय घेऊ.

श्रीमती.शेख नरगीस :विकासाच्या कामासाठी लवकरात लवकर वॉर्ड अभियंता यांना इस्टीमेंट तयार करायला सांगावे.

वॉर्ड अभियंता :मा.सभापती साहेब अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया चालु आहे.

श्री.अजिम अहेमद :GST मुळे इस्टीमेंट ला अडचण येत आहे. याच्या मुळे खुप उशीर होत आहे.

मा.सभापती :याच्या मध्ये शहर अभियंताला आदेशित करण्यात येते कि, GST बदल योग्य ती माहिती घ्या. पुन्हा पाठवायला वेळ जाईल GST ॲड करुन पाठवा.

श्रीमती.शेख नरगीस :रु. पाच लाखा खालचे कामाचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना देण्यात यावे. ते काम लवकरात लवकर करण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यानी जी मागणी केली कि, रु. पाच लाखाचे अंदाजपत्रक प्रस्ताव लवकरात तयार करण्यात यावा.

श्रीमती.संगिता वाघुले :मा.सभापती साहेब GST मुळे कामे होत नाहीत माझी अशी विनंती कि, लवकरात लवकर अंदाजपत्रक तयार करुन देयाचे आदेश करावे.

मा.सभापती :प्रत्येक वॉर्डातील अधिकारी यांनी दखल घ्या आणि आपल्या आपल्या भागातील जे नगरसेवक असतील त्यांच्या अंदाजपत्रके असेल तयार करुन घ्या. GST बदल काही आडचण आली आसेल तर शहर अभियंता यांच्याशी चर्चा करा.

श्री.ऋषिकेश खैरे :माझ्या वॉर्डातील शौचालय आहेत. जवळपास दीड वर्ष झाली तेथे त्याचे काम झ ाले नाही.ती कोणी पाहत सुध्दा नाहीत.

वॉर्ड अभियंता :श्री.ऋषिकेश खैरे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात मागच्या आठवडयात ही चर्चा झालेली आहे.नाला वर ठाकायला काही अडचण नाही.फार छोटा नाला आहे. कारण आम्ही पुर्ण पावसाळा थांबलो व सिमेंट रोड साठी सर्व्हे केला आणि तीथे काही लोकांनी जागा ताब्यात केलेली आहे. महानगरपालिकेच्या परवानगीवरुन तसा प्रस्ताव आम्ही सादर केलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :भारत नगर,गणेश नगर भागात जलवाहीनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी सुचना दिल्या होत्या तेथे मोजमाप घेण्यासाठी कुणी आले नाही. हे काम होणार की नाही? खुलासा घ्यावा.

उपअभियंता(पाणी पुरवठा):सध्या तेथील मेझरमेन्टचे काम चालु आहेत. मी आता फोन करुन विचारले तेथे साईटवर काम चालु आहे.

मा.सभापती :लवकरात लवकर अंदाजपत्रक तयार करुन काम पुर्ण करा.

श्रीमती.संगिता वाघुले :मा.सभापती ज्या ज्या ठिकाणी पाण्याचे पाईप नाही असा वॉर्डमध्ये एका टँकर मध्ये 18 ड्रम पाणी जाते तर एका ड्रमला 366 रुपये एवढा महिना भराव लागतो. महिन्याचा हिशोबानी त्याना एका वर्षाचे 4,392 रुपये भरावे लागतात तर गरिब लोक ऐवढे पैसे भरत असल तर हे लोक 3 ते 4 हजार रुपय भरु शकत नाहीत का. आपण श्रीमंत लोकानाच पाणी दयाच का गरिब लोकाना पाणी नाही दयाच का आणि ज्या ज्या वॉर्डमध्ये पाईपलाईन नाही, त्या ठिकाणी पाईपलाईन टाकण्यात यावी.

मा.सभापती :हा विषय असा आहे कि, प्रत्येक वॉर्डमध्ये पाण्याचे समस्या आहे. याच्यामध्ये लोक पैसे देऊन पाणी घेतात. त्यासाठी आपल्याला पाण्याचे पाईप लाईन करणे गरजेचे आहे. याच्या मध्ये काही आडचण आलेली आहे का. ते बघा.

उपअभियंता(पाणी पुरवठा):मा.सभापती साहेब ज्या ज्या ठिकाणी पाण्याचे पाईप लाईन नाही. त्यांना आम्ही एक ड्रम पाणी देतो. एका ड्रम मध्ये 200 लिटर पाणी आहे.

मा.सभापती :तुम्ही या विषयाची योग्य ती माहिती घेऊन मला सांगावे.

**विषय क्र. 171 : (कार्यकारी अभियंता-1,2,3 व 8)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.08 अंतर्गत प्रभाग क्र.105,106 ते 111 मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.49,94,151/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.17/10/2017 अन्वये प्रशासकीय आदेश प्राप्त झाले आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील लेखाशिर्ष रस्ते देखभाल दुरूस्ती Ward-8-P.No.12 वर तरतुद उपलब्ध आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.49,94,151/- मंजूरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.08 अंतर्गत प्रभाग क्र.105,106 ते 111 मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,94,151/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 172 : (कार्यकारी अभियंता-1,2,3 व 8)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्य अग्निशमन दल पदमपुरा इमारतीवर इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर येथे अतिरिक्त मजल्याची वाढ करणे प्रकल्प किमंत रू.2,56,03,314/- चे काम हाती घेण्यात आले असून, सद्यस्थितीत सदरचे काम पूर्णत्वाकडे आहे. या कामासाठी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन मे.आकांक्षा असोसिएटस् द्वारा मृगअंक अे. लेंभे यांची प्रकल्प किमंतीच्या रू.1.5% टक्के दराने नेमणूक करण्यास दि.28/06/2013 रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार करारनामा करून कार्यादेश देण्यात आला आहे. सदरचे दर मनपा पॅनलवरील अर्किटेक्ट/इंजिनिअर यांचे ठरविलेल्या दरानुसार योग्य आहेत.

सदर अर्किटेक्ट/इंजिनिअर (PMC) यांचे या नेमणूकीत मा.स्थायी समितीची मंजूरी घेण्याचे अनावधानाने राहून गेले होते. सदर आर्किटेक्ट/इंजिनिअर कामाचा कार्यादेश झाल्यापासून म्हणजेच सन 2013-14 पासून या प्रकल्पावर काम करीत आहेत. मात्र वरील अडचणीमुळे त्यांचे देयक देणे शक्य झाले नाही. त्यासाठी वरील मान्य दरानुसार मे.आकांक्षा असोसिएटस मृगअंक अे.लेंभे यांचे देयक अदा करणेसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. तरी वर नमुद प्रमाणे या कामासाठी मे.आकांक्षा असोसिएटस (मृगअंक लेंभे) यांची एकूण प्रकल्प किमंतीच्या 1.5% दराने काम करून घेण्याचा कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अवलोकनार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य अग्निशमन दल पदमपुरा इमारतीवर इमर्जन्सी ऑपरेशन सेंटर येथे अतिरिक्त मजल्याची वाढ करणे या कामासाठी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन मे.आकांक्षा असोसिएटस् द्वारा मृगअंक अे. लेंभे यांची प्रकल्प किमंतीच्या रू.1.5% टक्के दराने काम करून घेण्याच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 173 : (मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला जगदगुरू संत तुकाराम महाराज नाट्यगृह, एन-5 सिडको येथील कँटीन चालविणेसाठी कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/मामअ/2017/232, दि.30/05/2017 अन्वये वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देऊन निविदा मागविण्यात आल्या असता, सदर कँटीनसाठी एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदा मालमत्ता अधिकारी, लेखाधिकारी यांचे समक्ष दि.21/06/2017 रोजी उघडण्यात आल्या, त्याचे दर खालीलप्रमाणे.

**जगदगुरू संत तुकाराम महाराज नाट्यगृह कॅन्टीन :-**

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | प्रतीमाह प्राप्त निविदा दर रक्कम रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.शंकर तुकाराम वाघ | रू.8500/- (आठ हजार पाचशे) |
| 02. | श्री.दिलीप विठ्ठलराव बनसोडे | रू.7300 (सात हजार तीनशे) |
| 03. | श्री.अविनाश महाजन | रू.7100/- (सात हजार शंभर) |

उपरोक्त सदर जगदगुरू संत तुकाराम महाराज नाट्यगृह कँटीन करीता एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या असून तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सदर निविदा सर्वात जास्त दराची निविदा श्री.शंकर तुकाराम वाघ यांची निविदा रक्कम रू.8500/- प्रतीमाह असून त्यास प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

करीता त्यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. मान्यता झाल्यास संबंधीताकडून अटी शर्तीप्रमाणे करारनामा करून घेऊन कार्यादेश देण्यात येईल.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो. तसेच ऐनवेळचे विषय क्र.174 ते 178 मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला जगदगुरू संत तुकाराम महाराज नाट्यगृह, एन-5 सिडको येथील कँटीन चालविणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.शंकर तुकाराम वाघ यांची प्रतीमाह रक्कम रू.8500/- दराच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 174 :**

विषय : जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून पर्यावरण संवर्धन संदर्भात प्रदुषण नियंत्रण संबंधी समाजात जनजागृती करण्यासाठी दृश्य फलकाद्वारे संदेश देणेसाठी शहरात विविध ठिकाणी फलक उभारणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-2017-AMCA-213324-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता - 1 |
| 2. | कामाचे स्वरुप | औरंगाबाद शहरामध्ये विविध ठिकाणी पर्यावरण बाबत संदेश फलक उभारणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा ठराव विषय क्र.979 दि.20/04/2017 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,30,36,716/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | 1.दैनिक सामना, 2.दैनिक शिवनातीर, 3.दैनिक अलजजीरा (उर्दू) |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 22/05/2017 पर्यंत |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 05/06/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | दोन वेळा निविदा मागविण्यात आल्या, पहिल्या वेळेस दोन निविदा प्राप्त झाल्या व दूसऱ्यावेळी तीन निविदा प्राप्त झाल्या. |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदार/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम/दर/फेर दर रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | विश्व मल्टी सर्विसेस | 1,29,07,652/- | 0.99 % कमी + वाटाघाटी अन्वये 0.5% ने कमी असे एकूण 1.49% कमी |
| 2 | मे.महाराणा सेक्युरिटी लेबर सप्लायर्स | 1,29,38,940/- | 0.75% कमी |
| 3 | सिध्दार्थ मल्टी सर्विसेस | 1,29,71,532/- | 0.50% कमी |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागू नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त अनुदानातून (DPDC) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही. |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | --- |

विश्व मल्टी सर्विसेस यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.99% कमी दराने निविदा दाखल केली होती. वाटाघाटी दरम्यान त्यांनी आणखी 0.5% दर कमी केले आहे. म्हणजेच एकूण 1.49% कमी दरानी काम करण्यास त्यांनी संमती दिली आहे.

तरी, सदरील काम विश्व मल्टी सर्विसेस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.49% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.1,28,42,469/- चे काम करून घेण्यास अधिक टेंडर अटी करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनेतून पर्यावरण संवर्धन संदर्भात प्रदुषण नियंत्रण संबंधी समाजात जनजागृती करण्यासाठी दृश्य फलकाद्वारे संदेश देणेसाठी शहरात विविध ठिकाणी फलक उभारणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक विश्व मल्टी सर्विसेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.49% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,28,42,469/- पर्यंत सदर काम करून घेण्यास अधिक टेंडर अटी करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 175 :**

विषय : रामनगर-विठ्ठलनगर अंतर्गत जालना रोड ते शाहुनगर या 24 मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे काँक्रीटींग करणे. या कामाचे ठेकेदार सहारा कन्स्ट्रक्शन, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.01% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.2,25,19,734.30/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-2017-AMCA-237112-1, दिनांक 09/10/2017 सन 2017-18.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | मुलभुत भौतीक सुविधा |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, रक्कम रू.2,48,92,853/- मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1171, दिनांक 20/07/2017 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 2,37,07,478/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकमत टाईम्स, दै.नवा मराठा, दै.सह्याद्री टाईम्स ई-टेंडर विभाग पत्र जा.क्र./मनपा/ई-निविदा/2017/264, दिनांक 21/08/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक 12/08/2017 ते 05/09/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 09/09/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | चार |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | सहारा कन्स्ट्रक्शन | 2,25,19,734.30 | अं.प.दरापेक्षा 5.01% कमी दराने |
| 2 | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद | 2,65,52,376.48 | अं.प.दरापेक्षा 12% जास्त दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 2,67,89,451.27 | अं.प.दरापेक्षा 13% जास्त दराने |
| 4 | हायटेक इन्फ्रा, औरंगाबाद | 2,75,00,675.64 | अं.प.दरापेक्षा 16% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मुलभुत भौतीक सुविधा |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | मुलभुत भौतीक सुविधा |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |

विषयांकित कामासाठी ठेकेदार सहारा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी 5.01% कमी दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार सहारा कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून 5.01% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.2,37,07,478/- पर्यंत करून घेणेस आणि Star Rate नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रामनगर-विठ्ठलनगर अंतर्गत जालना रोड ते शाहुनगर या 24 मीटर रूंद विकास योजना रस्त्याचे काँक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक सहारा कन्स्ट्रक्शन, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.01% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.2,25,19,734.30/- पर्यंत करून घेणेस आणि Star Rate नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 176 :**

विषय : वार्ड क्र.113 मधील शिवाजीनगर बारावी योजने पासून ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे बाबत. या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.7585600/- या रक्कमेस मान्यता घेणे बाबत तसेच सदर कामाचे ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन, कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.00% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.7368831.98/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-207871-12, सन 2017-18.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-1 कार्यालय. |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.113 मधील शिवाजीनगर बारावी योजने पासून ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 7585600/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 7224345.08 |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत (एकूण 4 वेळा) (2 वेळा फेर निविदा, 1 वेळा मुदतवाढ) | 10/04/2017 ते 17/06/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 28/06/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्काराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | 7224345.08 | 4.99 टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | निरंक |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | विकास योजनेअंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे व नविन डांबरी रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |

तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.स्टार कन्स्ट्रक्शन, यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.00 टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 7368831.98/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : या विषयामध्ये दुरूस्ती आहे, 2.00 टक्के कमी दर याऐवजी 2.00 टक्के जास्त दर अशी दुरूस्ती आहे, दुरूस्तीसह विषयास मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.113 मधील शिवाजीनगर बारावी योजने पासून ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशनकडे जाणाऱ्या विकास योजनेतील रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे या कामासाठी प्राप्त झालेले निविदाधारक मे.स्टार कन्स्ट्रक्शन, कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.00% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.7368831.98/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 177 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 27/09/2016 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेने विषय क्र.41 नुसार सातारा देवळाई भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी नविन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत होणाऱ्या वाढीव खर्चासह मे.चांगदेव नारायण कातकडे यांचे टँकर्स कार्यरत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान केलेली आहे. उपरोक्त मंजुरीच्या अधिन राहून संबंधीतांना माहे जुलै 2016 ते सप्टेंबर 2016 या कालावधीत सातारा-देवळाई परिसरास आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेला आहे. उपरोक्त कामाचे देयक रक्कम रूपये 19,94,621/- संबंधीतांना अदा करावयाचे आहे.

करीता पाणी पुरवठा प्राधान्य लक्षात घेता होणाऱ्या खर्चाबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक 27/09/2016 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेने विषय क्र.41 नुसार सातारा देवळाई भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी नविन एजन्सीची नियुक्ती होईपर्यंत होणाऱ्या वाढीव खर्चासह मे.चांगदेव नारायण कातकडे यांचे टँकर्स कार्यरत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान केलेली असल्यामुळे, संबंधीतांने माहे जुलै 2016 ते सप्टेंबर 2016 या कालावधीत सातारा-देवळाई परिसरास आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेला असल्याने, उपरोक्त कामाचे देयक रक्कम रूपये 19,94,621/- संबंधीतांना अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 178 :**

विषय : झोन क्र.9 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.66,70,71,102,103 व 104 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणे या कामाचे ठेकेदार मे.व्हिबीए इन्फ्रा. (Ms.VBA INFRA) यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.80% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.52,31,260/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-2017-AMCA-233738-3, सन 2017-18.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.09 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्यांचे डांबरीकरणाद्वारे पॅचवर्क |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 49,91,660/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 49,91,660/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 04 ऑगस्ट 2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 09 सप्टेंबर 2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 02 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.व्हिबीए इन्फ्रा. (Ms.VBA INFRA) | 53,84,004.36/- | 07.86% जास्त दराने |
| 2 | श्री.मोहम्मद अहेमद सिध्दीकी | 54,90,826/- | 10.00% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | ----- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | रस्ते देखभाल व दुरूस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.स्थायी समिती सभा दि.06/07/2017 विषय क्र.17 |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.व्हिबीए इन्फ्रा.(Ms.VBA INFRA) यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 04.80% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.52,31,260/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी स्टार दर सुत्रानुसार फरक अदा करणेस/स्टार दर व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.9 कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.66,70,71,102,103 व 104 अंतर्गत मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे मान्सुनपूर्व पॅचवर्क व दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.80% जास्त दराचे निविदाधारक मे.व्हिबीए इन्फ्रा.(Ms.VBA INFRA) यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.80% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.52,31,260/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी स्टार दर सुत्रानुसार फरक अदा करणेस/स्टार दर व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद